

प्रेरणा :- भारत देशाच्या शिक्षण मंत्रालयाचे उन्नत भारत अभियान

''हात मदतीचा - नावाजलेल्या ज्ञानोपासक परिवारातील शिकलेल्या लोकांचा''

ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे

# ग्राम सक्षमीकरण अभियान

-: संकल्पना :-

## समीर गणेशराव दुधगांवकर

अमेरिकेतून पदव्युत्तर, राज्य उद्योग संघटनेचे नावाजलेले नेतृत्व, परभणी युथ आयकॉन, श्रीमद्‌भगवद्गीता अभ्यासक

## सामाजिक समरसता प्रकल्प

- जागतिक परिस्थितीचा परिणाम म्हणा की काही म्हणा, सध्या भारतातील 8 करोड लोकांना मन:शांती लाभावी म्हणून रोज औषधे घ्यावी लागत आहेत.
- व्यसनाधीनता वाढली आहे.
- पांढरपेशी लोकांचे गुन्हे वाढत आहेत.

**जाणकार सांगतात की भारतीय संस्कृती दुर्लक्षित केल्यामुळे हे घडले आहे.**

**हिंदू संस्कृती सर्वात प्राचीन आहे. रोजचे आयुष्य जगताना योग्य निर्णय घेण्यासाठी 5000 वर्षापूर्वी श्रीमद्‌भगवद्गीतेने संदेश दिला आहे.**

**★ अध्याय सोळावा, श्लोक 13 ते 15 शिकवितात की पैसे-पैसे करणारी लोकं वाईट प्रवृत्तीची असतात.**

**★ अध्याय सोळावा, श्लोक 21 शिकवितो की :-**

**काम, क्रोध आणि लोभ ही नरकामध्ये नेणारी तीन द्वारे आहेत. प्रत्येक समजुतदार मनुष्याने त्यांचा त्याग केला पाहिजे, कारण या तिन्हींमुळे आत्म्याचा विनाश होतो.**

**ह्याचा अर्थ काय?? अर्थ हा की मानवजातीने पैश्याला सर्वस्व मानू नये (अर्थार्जनाला आयुष्यातले एकमेव अर्थपूर्ण काम समजू नये..)**

**मग काय करावे? समजुतदार लोकांनी माणुसकी जपून स्वत:च्या स्वभावाप्रमाणे काम करावे.!!**

अनुभवी लोकं सांगतात की माणूस फक्त 6 प्रकारची कामे करु शकतो. ह्यातून बोध घेवून ग्राम सक्षमीकरण अभियानात आम्ही घरो-घरी जावून स्वभावाप्रमाणे या ६ पैकी कोणतेही एकच काम निवडण्याच्या विचाराचे महत्व समजून सांगणार आहोत. लोकांनी निवडलेल्या कामात मदत करणार आहोत.

| काम करण्याचा प्रकार (करिअरचा प्रकार) |
|---|
| करिअर 1-A- सरकारी नौकरी (सरकारी नौकरी म्हणजे भ्रष्टाचार करण्याची संधी असा विचार करु नये. इतरांची सेवा करण्याचा स्वभाव असेल तर सरकारी नौकरी करणे योग्य !!) |
| करिअर 1-B- खाजगी कंपनीत नौकरी |
| करिअर 2 - छोटा व्यवसाय करणे (दुकान चालवणे, शेतीआधारीत उद्योग, डॉक्टर, वकीली, ईत्यादी कामे) |
| करिअर 3 - मोठा व्यावसायिक बनणे (टाटा-बिर्ला सारखे) |
| करिअर 4 - गुंतवणुकीतून मोठी कमाई करणे |
| करिअर 5 - सामाजिक काम किंवा राजकारण करणे (पैशासाठी करिअर 1B/2/3/4 करावे. पैशाचा उद्देश ठेवून राजकारणात काम करु नये. लोकांच्या भल्यासाठी असलेला निधी खावुन राजकारण करत जगु नये) |
| सध्या काहीच नक्की न ठरलेले |

**ज्ञानोपासक शिक्षण मंडळ, परभणी. (स्थापना 1981).** आजतागायत 50,000 परिवारांना उच्च दर्जाचे शिक्षण देणारी संस्था

254 गावांच्या जनतेच्या सेवेत 15 मुलभूत विषयांवर काम करणारे अभियान-शेत रस्ते, सिंचन व्यवस्था, युवकांना रोजगार उपलब्ध करुन देणे, उद्योग उभारण्यात मदत, पर्यावरण, स्वच्छता मोहीम वगैरेवर गावागावांत हातभार लावणारे अभियान.



**समीर दुधगांवकर.** M.S. Mech Engg (USA) + 91 9820 23 0402 iksamird@gmail.com

कार्यालय → C विंग, लायब्ररीच्या खाली, ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर रोड, परभणी - 431 401

+ 91 9422 93 5407 trinity022008@gmail.com



प्रेरणा :– भारत देशाच्या शिक्षण मंत्रालयाचे उन्नत भारत अभियान

''हात मदतीचा – नावाजलेल्या ज्ञानोपासक परिवारातील शिकलेल्या लोकांचा''

ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे

# ग्राम सक्षमीकरण अभियान

–: संकल्पना :–

## समीर गणेशराव दुधगांवकर

अमेरिकेतून पदव्युत्तर, राज्य उद्योग संघटनेचे नावाजलेले नेतृत्व, परभणी युथ आयकॉन, श्रीमद्‌भगवद्गीता अभ्यासक

**भारतीय संविधानामध्ये सर्वांना संधी मिळायला हवी असाही एक मुद्दा आहे.**
तसे झाले आहे असे तुम्हाला वाटते का? खरी परिस्थिती पाहिल्यास तसे झालेले नाही, असे आढळून येते. लोभापायी इतरांना वेठीस धरुन, इतरांचा वापर करुन स्वत:ला आणि फक्त स्वत:च्या घरच्यांनाच सगळं कसं मिळवून देता येईल, असे बघणारे जास्ती दिसत आहेत.

**लोभ हा कुठे नेणारा मार्ग आहे हे श्रीमदभगवद्गीतेत तर सांगितलेच आहे. सगळी कामे एकच परिवार करणार मग बाकीचे काय करणार ?? कुठलाही लोभ न ठेवता काम करण्याच्या प्रकारांपैकी फक्त एकच प्रकार निवडावा. असे वागल्यामुळे सगळ्या घटकांना संधी मिळू शकतील.**

तसेही लोभी न राहता माणसाने स्वत:च्या स्वभावासारखे काम केल्यास चरितार्थ पण चांगला होईल आणि आयुष्याचे समाधान सुद्धा जास्त मिळेल.

प्रत्येक घरा–घरात जाऊन समजुतदार, समंजस लोकांना हे समजावून सांगत, लोकांच्या वेगवेगळ्या करिअर निवडीमार्फत आणि इतरांच्या भल्याबाबत सकारात्मक असण्यातून सगळीकडे सौहार्दाचे (सामाजिक समरसतेचे) वातावरण सगळ्या जिल्ह्यांमध्ये निर्माण करण्यासाठी हे काम चालू आहे.
**यासाठी आम्ही हे मिशन हाती घेतले आहे..**

**आत्म्याचा विनाश न करता स्वत:च्या आवडीचे काम केल्यास नि:स्वार्थी, आनंदी आणि एकसंघ समाज नक्कीच निर्माण होईल...!!**

**सारांश :–**

1. **लालच बुरी बला असे आपली संस्कृती शिकविते.**
2. **स्वत:चा स्वभाव ओळखून त्याप्रमाणे कामाचा प्रकार निवडावा आणि आयुष्यभर आनंदात काम करावे.**
3. **संविधान सांगते की सगळ्यांना संधी मिळाली पाहिजे. सगळे एकाच परिवारात आणि बाकीच्यांना काहीच नाही मिळू देणार असे वागणे अयोग्य तर राहीलच, परंतु ते असंवैधानिक देखील असेल.**

### भविष्य घडविण्यासाठी आमचे इतर काही प्रकल्प...

★ समाजात एक म्हण प्रचलित आहे– **'नोकरी नाही तर छोकरी नाही...'**. आपल्या भागातील परिवारांची लग्नाच्या बाबतीतील यामुळे होणारी अडचण दुर व्हावी म्हणून रोजगार लावण्याचे काम राज्यभर चालु आहे. प्रत्येक महिन्यात 25 तारखेला रोजगार मेळावा परभणी, जिंतूर येथे ज्ञानोपासकच्या संस्थेत घेण्यात येतो. राज्यातील वेगवेगळ्या ठिकाणी सुद्धा रोजगार मेळावा वारंवार घेण्यात येतो. (रोजगारासाठी संपर्क क्रमांक : 9403 84 6415)

★ देशाच्या शिक्षण मंत्रालयाच्या निर्णयातुन प्रेरणा घेवुन कित्येक जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासासाठी टीम समीरने सुरु केलेल्या **ग्राम सक्षमीकरण अभियानाच्या** माध्यमातून शेकडो खेड्यापाड्यातील लोकांच्या समस्या सोडवणे सुरु आहे.

★ शेतकऱ्यांना शेतमाल विकण्यासाठी **बाजारपेठ** : शेतकऱ्यांनी दर्जेदार मालाचे उत्पन्न घ्यावे, दर्जेदार पॅकिंग करावी. त्यांचा माल मोठमोठ्या मार्केटमध्ये विकण्यासाठी समीर दुधगांवकर ह्यांचे उद्योग क्षेत्रातील संबंध शेतकऱ्यांना मदतगार होत आहेत.

★ विद्यार्थ्यांसोबत सतत हितगुज चालू असते. त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना जागतिक दर्जाचे मार्गदर्शन केले जात आहे.

**एकमेकां सहाय्य करु अवघे धरु सुपंथ** या उक्तीप्रमाणे टीम ग्राम सक्षमीकरण अभियान यांच्या या सत्कार्याला मदत करा, या विधायक कार्यात सहभागी व्हा आणि आपण मिळुन जिल्ह्याच्या व राज्याच्या विकासासाठी प्रयत्नरत राहुया !!